# मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांच्या चाचण्या होणार



**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गाच्या आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्यादरम्यान भारतीय रेल्वेच्या संशोधन डिझाईन आणि मानक संस्था अर्थात रिसर्च डिझाईन अॅण्ड स्टॅण्डर्ड ऑर्गनायझेशन चाचण्या पूर्ण झाल्या आहेत. आता मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांच्या अर्थात सीएमआरएसच्या चाचण्यांसाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने सज्जता दर्शवली आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने प्रोटोटाईप मेट्रोच्या मदतीने चाचण्या सुरू केल्या होत्या. मेट्रो डब्यात अवजड सामान भरल्यानंतर पहिल्यांदाच संपूर्ण क्षमतेने चालवण्यात आल्या होत्या. सध्या विद्युत प्रणालीची चाचणी आणि सिग्नलिंगसह रोलिंग स्टॉकची एकात्मिक चाचणी सुरू आहे. मेट्रो ३ च्या चाचण्या पूर्ण झाल्यानंतरच मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तालयाचे पत्र मिळणार आहे. सर्व चाचण्या पूर्ण झाल्यानंतरच जुलै महिन्यात सुरुवातीलाच मेट्रो ३ चे लोकार्पण करण्यात येणार आहे. लोडेड मेट्रो ट्रायल्सदरम्यान मेट्रो सातत्याने सुरू ठेवून सिग्नलिंग यंत्रणा, फेऱ्या, ट्रॅक, आवाज, घर्षण, वक्रता डब्यांची दोलनामय स्थिती या सर्व बाबींचा अभ्यास करण्यात आला. भारतात पहिल्यांदाच ८ गाड्या असलेल्या मेट्रो ट्रेनमध्ये ७५ टक्के क्षमता कार्यरत असून, इतर मेट्रो मार्गांची क्षमता ५० टक्के कार्यरत आहे. सध्या प्रकल्पाचे काम ९६ टक्के पूर्ण असून, उर्वरित कामांमध्ये स्थानकांचे सुशोभीकरण, स्थानके आणि फलाटांवरील सुविधा यांचा समावेश आहे. एमएमआरसीएलच्या ताब्यात १९ रेक असून, पहिल्या टप्प्यासाठी पुरेशा आहेत. पहिल्या टप्प्यादरम्यान २६० फेऱ्यांमधून १७ लाख दैनंदिन प्रवासी संख्या असणार आहे.